# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०६/२०२५ (बुधवार)**

---

## प्रतिबंधीत अन्नपदार्थाची (गुटख्याची) वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक १०/०६/२०२५ रोजी केळवद पोलीस, पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराद्वारे माहिति मिळाली की, मध्यप्रदेश पांढुर्णा कडुन केळवद मार्गे नागपूर कडे प्रतिबंधीत अन्नपदार्थ गुटखा ची अवैधरित्या वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा खुर्सापार फाटयाजवळ नाकाबंदी केली असता पांढुर्णा कडुन एक सुझुकी कंपनीची पांढऱ्या रंगाची दुचाकी वाहन क्र. एम. एच. ४९ टी. सी. ०२७ येतांना दिसली. पोलीसांनी सदर वाहन चालकास वाहन थांबविण्यासाठी इशार केला असता चालक वाहन न थांबविता कच्च्या रस्त्याने खुर्सापार कडे पळुन गेले. पोलीसांनी शिताफिने दुचाकीचा पाठलाग करून नमुद दुचाकीला येलकापार फाटा येथे गाठले. सदर वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता पांढऱ्या रंगाच्या बोरीत महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला गुटखा मिळुन आला. वाहन चालक आरोपी नामे **शेख शफीक शेख रफीक, वय ३१ वर्षे, रा. बागखेडा, टिकमी, छोटी मस्जिद जवळ, मोमीनपुरा, नागपुर** आणि **सुरेन्द्र उर्फ कल्लु लिलाधर होले, वय २२ वर्षे, रा. टिमकी ,तीनखंबा, कोलंबा स्वामी मंदीरा जवळ ,गांधीबाग नागपुर** हे मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष गुटखा (पी. के. ब्रॅन्ड ) १०० ग्रॅम वजनाची एकुण ३६० कंपनी पॅकबंद टिन डब्बे, एकुण ३६ किलो प्रतिबंधित अन्नपदार्थ साठा किंमती ३६,०००/— रूपये तसेच एक सुझुकी कंपनीची दुचाकी वाहन क्र. एम. एच. ४९ टी. सी. ०२७ किंमती १,००,०००/—रूपये असा एकुण १,३६,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी नामे शेख शफीक शेख रफीक, वय ३१ वर्ष, रा. बागखेडा, टिकमी, छोटी मस्जिद जवळ, मोमीनपुरा, नागपुर आणि सुरेन्द्र उर्फ कल्लु लिलाधर होले, वय २२ वर्ष, रा. टिमकी ,तीनखंबा, कोलंबा स्वामी मंदीरा जवळ ,गांधीबाग नागपुर यांनी सदर प्रतिबंधीत गुटखा मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीतांविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **नमुद आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १०/०६/२०२५ रोजी कन्हान पोलीस, पोलीस स्टेशन हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घाट रोहना येथे नाकाबंदी केली असता एक टाटा योधा वाहन क्रमांक डब्ल्यु. बी. ९५ ए. ५५८० मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे राहुल हिरालाल नामूते, वय ३१ वर्षे, रा .सुरादेवी कोराडी, हा मिळुन आल्याने त्याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच वाहन मालकाचे नाव पत्ता विचारले असता वाहन मालक नामे शरद गोमेकर, रा. कामठी** असल्याचे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** टाटा योधा वाहन क्रमांक डब्ल्यु. बी. ९५ ए ५५८० किमती ५,००,०००/—रूपये **व २)** १ ब्रास रेती किंमती ४,०००/— रूपये आणि असा एकुण ५,०४,०००/—रूपयेचा माल जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपी वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द कलम ३०३(२) भा. न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## कोंबडयांची झुंज लावुन जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हा नोंद.
## कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ११/०६/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की,काही इसम मौजा पटेल नगर, पिपरी येथे विजु शेंडे याचे घरासमोर कोंबडयाची झुंज लावून पैशांचा हारजितचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कन्हान पोलीस घटनस्थळी पोहचले असता, नमुद ठिकाणी काही इसम कोंबडयांच्या पायाला धारदार काती बांधुन त्यांच्यी झुंज लावुन पैशांचा हारजितचा खेळ खेळतांना दिसुन आले. पोलीसांनी सापळा रचुन धाड टाकली असता **आरोपी क्र. १) मनोज वसंतराव कांबळे,वय ३५ वर्षे, रा. पिपरी कन्हान आणि २) विजु भिकाजी शेंडे, वय ४९ वर्षे, रा. पटेल नगर, पिपरी, कन्हान ३) अभिषेक मारोती मोहोड, वय २१ वर्षे, रा. पाटण सांवगी ता. सावनेर ४) अनुप पांडुरंग वैदय, वय ४५ वर्षे, रा. शितलवाडी , रामटेक ५) बाळकृष्ण महादेव हावरे, वय ६० वर्षे, रा. पटेल नगर, पिपरी, कन्हान, ६) पारस कवडुनाथ नानवटकर, वय ३२ वर्षे, रा. प्रगती नगर, कन्हान हे घटनास्थळी मिळुन आले.** पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातून १) रोख रक्कम २) तीन ॲन्ड्रॉईड मोबाईल ३) दोन कोंबडे , ४) दोन लोखंडी धारदार काती असा एकुण ३२,७८० /— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

नमुद आरोपी क्रं १ ते ६ यांच्यावर कन्हान पोलीस स्टेशनला १२ (ब) म. जु. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने